राज्यातील शासकीय विश्रामगृहांची इत्यंभूत माहिती (विश्रामगृहांची स्थिती, उपलब्ध सुविधा, एकूण कक्ष, आरक्षणाबाबतची माहिती, संबंधित अधिकारी) सार्वजनिक होण्यासाठी वेबसाईट व मोबाईल ॲप तयार करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - विश्राम-२०२३/प्र.क्र.१११/मि.व्य-२**
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ५ डिसेंबर, २०२३

**प्रस्तावना :-**महाराष्ट्र विधानमंडळाच्या जुलै, २०२३ रोजीच्या पावसाळी अधिवेशामध्ये राज्यातील विश्रामगृहांची दुरावस्था झाली असल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. सदर प्रश्नाचे सभागृहात उत्तर देताना मा.मंत्री (सा.बां.) यांनी महाराष्ट्र राज्यातील शासकीय विश्रामगृहांची इत्यंभूत माहिती (विश्रामगृहांची स्थिती, उपलब्ध सुविधा, एकुण कक्ष, आरक्षणाबाबतची माहिती, संबंधित अधिकारी) सार्वजनिक होण्यासाठी ॲप तयार करण्यात येत असल्याचे आश्वासन दिले. त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील विश्रामगृहांच्या आरक्षण Online पध्दतीने करण्यासाठी ॲप तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या विश्रामगृहांची स्थिती, उपलब्ध सुविधा, एकुण कक्ष, आरक्षणाबाबतची माहिती, संबंधित अधिकारी इ. माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच शासकीय विश्रामगृहांचे आरक्षण Online पध्दतीने वेबसाईट व मोबाईल ॲपव्दारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

ITCC Cell, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्या कार्यालयाकडून सदर वेबसाईट व मोबाईल ॲप तयार करण्यात येत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या विश्रामगृहांचे आरक्षण सदर वेबसाईट व मोबाईल ॲपव्दारे Online पध्दतीने सदर शासन निर्णय प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सुरू करण्यात येईल.

सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला असून त्याचा संगणक सकेतांक २०२३१२०५१५१५५७४४१८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Niranjan Arvind Telang

Digitally signed by Niranjan Arvind Telang
DN: c=IN, o=Personal, title=9063, pseudonym=808504E1840507D524A59E9B12022856, 2.5.4.20=89d38a2c9230e75a1a2c8fdd5df231d32cfece750d8169eb1e76253ec8cea058, postalCode=411007, st=Maharashtra, serialNumber=8A19090F62FA3B97329B76BE28B7ACCE0890866861A242BDCB38DB4A1D1CE2EA, cn=Niranjan Arvind Telang
Date: 2023.12.07 17:40:37 +05'30'

**( निरंजन तेलंग )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव.
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
११) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१२) प्रबंधक, मुळ शाखा, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१३) प्रबंधक, अपील शाखा, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१४) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग.
१७) वित्त विभाग (व्यय ४), मंत्रालय, मुंबई-३२.
१८) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्यृ
२१) महालेखापाल १/२, लेखा अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२२) महालेखापाल १/२ लेखा परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२३) महालेखापाल, (वाणिज्यिक लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२६) सर्व मंत्रालयांच्या विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये.
२७) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महाचंनालनाय, मुंबई.
२८) निवड नस्ती.